# कुंभमेळ्याचा खर्च दुष्काळी भागासाठी केला असता तर आत्महत्या थांबल्या असत्या

**कुंडल : वार्ताहर**

शासनाने कुंभमेळ्यासाठी केलेला खर्च दुष्काळी भागासाठी केला असता तर शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबल्या असत्या. संत तुकाराम महाराजांच्या गाथेचा सूर्य सर्वसामान्य माणसांच्या झोपडीपर्यंत पोहचला आहे, असे मत प्रा. शिवाजीराव भुकेले यांनी व्यक्त केले.


शिवाजीराव भुकेले

कुंडल (ता. पलूस) येथील क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड यांच्या ९३ व्या जयंतीनिमित्त क्रांतिअग्रणी समाज प्रबोधन संस्थेच्यावतीने आयोजित व्याख्यानमालेत पहिले पुष्प गुंफताना 'तुका झालासे कळस' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी क्रांती उद्योग व शिक्षण समुहाचे प्रमुख अरुणअण्णा लाड होते.

देशाचे मानसिक आरोग्य सुधारण्यासाठी संत तुकारामांच्या विचारांची गरज आहे. साधूच्या गांज्याच्या धुराच्या वलयात देशाची आध्यात्मिक सुधारणा कशी होणार, हा प्रश्न आहे. शासनाने कुंभमेळ्यासाठी केलेला खर्च दुष्काळी भागासाठी केला असता तर शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबल्या असत्या. क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड यांची अस्वस्थता उपभोगतावादी व्यक्तिंनी वाढविली होती, तर संत तुकोबांची अस्वस्थता त्या काळातील समाजव्यवस्थेने वाढविली होती.

या प्रसंगी क्रांती दूध संघाचे अध्यक्ष किरण लाड, युवा नेते शरद लाड, उद्योजक उदय लाड, व्ही. वाय. पाटील, हणमंतदाजी लाड, प्राचार्य डॉ. के. एन. नलावडे, कुंडलिक एडके, सरपंच सौ. मनीषा लाड, उपसरपंच हणमंत बंडगर, अनिल लाड, माजी सरपंच वसंतराव लाड, प्रा. डॉ. प्रताप लाड, सुमनताई गायकवाड, जे. पी. लाड, अशोकराव पवार, पंजाबराव पवार, ग्रामीण कथाकथनकार जयवंत आवटे, श्रीकांत माने, एन. डी. पवार, माणिक गोतपागर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

सुरुवातीस स्व. क्रांतिअग्रणी डॉ. जी.डी.बापू लाड व क्रांतिविरांगणा विजयाताई लाड यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्याहस्ते करण्यात आले. प्रास्ताविक प्रा. धनंजय होनमाने यांनी केले. सूत्रसंचलन रमेश जंगम यांनी केले. आभार व्ही. आर. माने यांनी मानले.

दै. पुढारी ०३/१२/२०१५

दै. पुढारी, ता. ०३/१२/२०१५

# शौर्यशाली कर्तृत्वाचा मानबिंदू : जी. डी. बापू

ब्रिटिश साम्राज्य सत्तेवर कधी सूर्य मावळत नव्हता. अशा या साम्राज्याला ज्या क्रांतिकारकांनी सळो की पळो करुन सोडले, त्यांना पकडण्यासाठी बक्षीस जाहीर करावे लागले होते. त्यापैकी एक होते क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड. त्यांची आज ९३ वी जयंती. त्यानिमित्ताने....

या क्रांतिकारकाचा जन्म कुंडल येथील गरीब शेतकरी कुटुंबात झाला. पुणे येथे आयुर्वेदिक महाविद्यालयात शिक्षण घेत असताना, महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली सुरु असलेल्या स्वातंत्र्य आंदोलनाने भारावून जाऊन, बापू; क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली सातारा प्रतिसरकारच्या चळवळीत सहभागी झाले.

बापूंच्या जीवनातील मोजके रोमहर्षक प्रसंग व धाडसी घटनांतील अंतरंग समजून घेतले, तर ब्रिटिशांनी त्यांचा एवढा धसका का घेतला होता, याची प्रचिती येते. त्यामध्ये शेणोली स्टेशनजवळील खिंडीत पे-स्पेशल रेल्वेगाडी लुटीची धाडसी योजना मोठ्या कल्पकतेने यशस्वी करुन अठरा मिनिटात डोंगर चढून बापूंनी



साथीदारांसह केलेले पलायन, कडेकोट बंदोबस्तातील पुण्याच्या येरवडा तुरुंगातून क्रांतिवीरांगणा लीलाताई पाटील यांची केलेली बेमालूम यशस्वी सुटका, धुळे खजिना लुटीत पोलिसांबरोबर झालेल्या चकमकीत पायाच्या पिंडरीतून बंदुकीची गोळी गेली असतानाही केलेले पलायन, ब्रिटिशांच्या शस्त्रागारातून हिसकावून आणलेल्या बंदुका, गोवा स्वातंत्र्यासाठी म्हापसा कचेरीवर केलेली बॉंबफेक, मामलेदाराला इंग्रजांचा युनियन जॅक खाली उतरवायला लावून गांधी टोपी घालून फडकवायला लावलेला तिरंगा ध्वज. इंग्रजी सत्तेचे खबरे असणाऱ्या व गोरगरिबांना त्रास देणाऱ्या, महिलांची अब्रू लुटणाऱ्या टग्यांना व कष्टकऱ्यांना लुटणाऱ्या सावकारांना तुफान दलाकडून पत्र्या जाहीर समारंभात लावून केलेल्या जबर शिक्षा, हे त्यांच्या शौर्यशाली कर्तृत्वाचे मानबिंदू आहेत.

- व्ही. वाय. पाटील

दै. लोकमत 4/12/2015

दै. लोकमत ता. ०४/१२/२०१५

# तत्वनिष्ठ क्रांतिकारक : जी. डी. बापू लाड

**स्वातंत्र्य आंदोलनात ब्रिटिश साम्राज्य सत्तेवर कधी सूर्य मावळत नव्हता, असे म्हटले जात असे. अशा या सामर्थ्यशाली साम्राज्य सत्तेला ज्या क्रांतिकारकांनी 'सळो की पळो' करून सोडले त्यापैकी एक होते क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड. आज (शुक्रवार) त्यांची जयंती. त्यानिमित्त...**



जाज्वल्य राष्ट्रभक्ती, प्रखर सामाजिक निष्ठा, संकटावर मात करण्याची जिद्द आणि अविचल तत्वनिष्ठेच्या बळावर देशाच्या स्वातंत्र्यासाठी आणि शोषणमुक्त लावून असीम धैर्याने लढलेल्या जी. डी. बापूंचा जीवन संग्राम हे सातारा प्रतिसरकारचे चळवळ हे धगधगते पर्व आहे.

शेणोली स्टेशन जवळील खिंडीत पे-स्पेशल रेल्वेगाडी लुटीची धाडसी योजना मोठ्या कल्पकतेने यशस्वी करून अठरा मिनिटात डोंगर चढून बापूंनी साथीदारासह केलेले पलायन, कडेकोट बंदोबस्तातील पुण्याच्या येरवडा तुरुंगातून क्रांतिविरांगना खजिना लुटीत पोलिसांच्या बरोबर झालेल्या चकमकीत पायाच्या पिंढरीतून बंदुकीची गोळी गेली असतानाही पोलिसांना झुकांडी देऊन केलेले पलायन, ब्रिटीशांच्या शस्त्रागारातून मोठ्या धाडसाने हिसकावून आणलेल्या बंदुका, गोव्याच्या स्वातंत्र्यासाठी म्हापसा कचेरीवर केलेली धाडसी बॉंबफेक, तासगाव मामलेदार कचेरीवरील मोर्चा हे बापूंच्या जीवनसंग्रामातील धाडसी प्रसंग, त्यांच्या शौर्यशाली कर्तृत्वाचे मानबिंदू आहेत. स्वातंत्र्योत्तर काळात फुले, शाहू, आंबेडकरांच्या व्यवस्था प्रस्थापित करण्याच्या इराद्याने बापूंनी आयुष्यभर समाज प्रबोधन केले. कष्टकऱ्यांचे अनेक प्रश्न मार्गी लावले. शेतीला पाणी, परवडणाऱ्या दराने वीजपुरवठा, शेतीमालाला किफायतशीर दराची हमी, प्रगत व्यावसायिक शिक्षण, बेरोजगारांना कामधंदा, शेती प्रक्रिया उद्योग, सहकार उद्योगाचे रक्षण याचा बापूंनी ध्यास घेतला होता. क्रांती सहकारी साखर कारखाना, दूध संघ उभारला. गरिबांच्या मुलांच्या शिक्षणासाठी गांधी एज्युकेशन सोसायटी व नाना पाटील बोर्डिंगची स्थापना

# प्रतिसरकारच्या चळवळीतील धगधगता अंगार : जी. डी. (बापू) लाड

**प्रखर राष्ट्रनिष्ठा, अन्याय, अत्याचार, सामाजिक-आर्थिक विषमतेसंबंधी मनस्वी चीड, व्यापक सामाजिक संबंध, जबरदस्त आत्मविश्वास, प्रतिसरकारच्या चळवळीतील धगधगता अंगार म्हणजे क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. (बापू) लाड. त्यांच्या जयंतीनिमित्त..**



जी. डी. (बापू) लाड

१९४२ साली भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाने सारा देश पेटून उठला होता. त्यावेळी जी. डी. बापू पुणे येथील आयुर्वेदिक महाविद्यालयात शिक्षण घेत होते. स्वातंत्र्य आंदोलनाने भारावून जाऊन शिक्षणाला रामराम ठोकला आणि ते क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखालील आंदोलनात सहभागी झाले.

त्याप्रमाणे बापूंनी निवडक साथीदारासह कोल्हापूर, सावळज पोलिस चौकी, सागाव पोलिस स्टेशनवर हल्ला चढवून शस्त्रे मिळविण्यात यश संपादन केले. याशिवाय सावकार, सरंजामदारांच्या बंदुका धाकाने काढून घेतल्या. त्यामुळे इंग्रज सरकार अधिक आक्रमक झाले. त्यांना शह देण्यासाठी क्रांतिकारकांनी बापूंच्या नेतृत्वाखाली मिरज परिसरातील व शेणोली ही स्टेशने इंग्रजी सत्ता खिळखिळी करण्याच्या इराद्याने जाळली. नंतर क्रांतिवीर नागनाथअण्णा व बापू यांनी चळवळीला पैसा कमी पडू लागला म्हणून शस्त्रे खरेदीसाठी कुंडल बँक लुटली, शेणोलीजवळ जीव धोक्यात घालून पे स्पेशल रेल्वेगाडी लुटली आणि अवघ्या अठरा मिनिटांत डोंगर पार करून क्रांतिकारक पसार झाले. धुळे खजिनाही तितक्याच शिताफीने लुटला. या काळात इंग्रजांनी गुन्हेगाराना उठवून बसवले. त्यांचाही या बहाद्दर क्रांतिकारकांनी बंदोबस्त केला. लुटीतून मिळालेल्या पैशातून गोवा, कोल्हापूर आदी ठिकाणांहून हिकमतीने, शस्त्रे खरेदी करून आणली. इंग्रजांच्या खबऱ्यांना शिक्षा दिल्या.

या सरकारने लढाऊ तरुणांची फौज तयार करण्यासाठी कुंडल येथे जी. डी. बापू व त्यांच्या साथीदारांच्या मार्गदर्शनाखाली युद्धशाळा स्थापन केली. बापूंनी या शाळेत युवकांना शस्त्रास्त्रांचा वापर व गनिमीकाव्याचे लढातंत्र शिकविले. गोरगरिबांची सुटका, दारूबंदी, हुंडाबंदी, अंधश्रद्धा निर्मूलन, ग्रामस्वच्छता आदी समाजोपयोगी कार्ये प्रभावीपणे त्यांनी राबविली. बापूंनी 'पेटलेले पारतंत्र्य आणि धुमसते स्वातंत्र्य' हे आत्मचरित्र लिहिले आहे. त्यामध्ये आपल्या साथीदारांचा नावनिशीवार गौरव केला आहे.

दै. सकाळ ०८/१२/२०१५

दै. सकाळ, ता. ०८/१२/२०१५

शुक्रवार, ४ डिसेंबर २०१५ तरुण भारत

# देशाला 'संत तुकारामां'च्या विचारांची गरज

## प्रा. शिवाजीराव भुकेले यांचे प्रतिपादन : क्रांतीअग्रणी डॉ.जी.डी.बापू लाड व्याख्यानमाला

वार्ताहर

कुंडल

आपल्या देशाचे मानसिक आरोग्य सुस्थितीत राहायचे असेल तर देशाला संतश्रेष्ट तुकाराम महाराजांच्या विचारांची गरज आहे, असे प्रतिपादन प्रा.शिवाजीराव भुकेले यांनी केले ते कुंडल येथे भारतीय लढ्यातील जेष्ठ स्वातंत्र्यसेनानी स्वर्गीय क्रांतीअग्रणी डॉ.जी.डी.बापू लाड यांच्या ९३ व्या जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानमालेचे पहिले पुष्प गुंफताना ते बोलत होते. यावेळी क्रांती उद्योग समुहाचे प्रमुख अरूण लाड, किरण लाड, शरद लाड आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रा.भुकेले यावेळी म्हणाले, तुकोबांच्या अभंगाची जादू अप्रतिम असून महाराष्ट्राची सांस्कृतिक मशागत तुकाराम महाराजांमुळेच आली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांना स्वराज्य निर्मितीसाठी प्रेरणा देण्याचे काम जिजाबाईनी केले तर तुकोबांनी त्यांना स्वराज्य निर्मितीचा मंत्र दिला. परंतु दर्दैवाने खरा इतिहास लपविला गेला ही खंत आहे. शिवाजी महाराज, तुकाराम महाराज व जी.डी. बापूंनी समाजउध्दाराचे काम केले. त्यांनी पारतंत्र्यातून जगाला मुक्त करण्याबरोबरच लोकांना स्वराज्याशी इमान दाखविणे, भोंदूगिरी, अनिष्ट प्रथा मोडून काढणे अशा समाजाला ज्ञानी व संपन्न बनविण्याचा प्रयत्न केला. छत्रपती शिवराय, तुकाराम महाराज, व जी.डी.बापूंच्या सारखे वीर या भूमित जन्माला आले नसते तर अजून किती वर्षे परकियांच्या जुलमी सत्तेत राहिलो असतो याचा विचार न केलेला बरा.



कुंडल : व्याख्यानमालेत बोलताना प्रा. शिवाजीराव भुकेले.

तुकोबांच्या व छत्रपतींच्या बाबतीत तथाकथीत भोंदूनी अनेक चमत्कार इतिहास मांडले आहेत. सावळा विठ्ठल लोकांना समजला तो तुकारामांच्यामुळे. एकीकडे आज महसूल बुडते म्हणून दारूबंदी न करणारे सरकार तर दुसरीकडे कर्जाने आत्महत्या करणारा शेतकरी यांना मदत न करता कुंभमेळ्यासारख्या थोतांडावर सरकार अडीच कोटी रू.खर्च करते. या प्रकारच्या कर्मकांडाला त्यांनी विरोध केला होता. म्हणून तुकाराम खऱ्या अर्थाने पुरोगामी संत होते.

प्रारंभी जी.डी.बापूंच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. स्वागत व प्रास्ताविक प्रा. डॉ.धनंजय होनमाने तर पाहुण्यांची ओळख प्रा.नवनाथ गुंड यांनी केले. शेवटी आभार प्रा.व्ही.आरमाने यांनी मानले. सुत्रसंचालन प्रा.गणेश खाटगे व रमेश जंगम यांनी केले.

यावेळी उद्योजक उदय लाड, जेष्ठ विचारवंत व्ही.वाय.पाटील, सयाजीराव पाटील, भरत पाटील, वसंतराव लाड, अशोक पवार, मनिषा लाड, विठ्ठल बंडगर, सुमनताई गायकवाड, एन.डी.पवार, अनिल लाड, मुकुंद जोशी यांच्यासह सर्व संस्थांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दै तरुण भारत, दि ०४/१२/२०१५

# मराठी माणूसच मायबोलीचे खच्चीकरण करतोय...

## विसुभाऊ बापट

कुंडल / वार्ताहर

पाश्चात्य देशाच्या संस्कृतीच्या मागे लागून मराठी माणूस मराठी मायबोलीचे खच्चीकरण करत आहे. मायबोली विसरला आहे. यासाठी घरातील मातांनी आपल्या मुलांना मराठी मायबोली मातृभाषेचे धडे देणे गरजेचे आहे, असे मत ज्येष्ठ कवी विसुभाऊ बापट यांनी व्यक्त केले.



कवी विसुभाऊ बापट

कुंडल येथे क्रांतिअग्रणी जी. डी. (बापू) लाड यांच्या ९३ व्या जयंतीनिमित्त समाज प्रबोधिनीच्या वतीने आयोजित व्याख्यानमालेत तिसरे पुष्प गुंफताना ते बोलत होते. कुटुंब रंगलंय काव्यात हा विषय होता. कवी बापट यांनी अनेक वेगवेगळ्या कवितांमधून समाजाच्या अनेक गोष्टी समोर आणल्या. शिक्षण व्यवस्था, भ्रष्टाचार, अराजकता, पाश्चात्य संस्कृती, शेतकरी आत्महत्या कुटुंब व्यवस्था या गोष्टींवर आधारीत अतिशय सुरेख विषय त्यांनी रसिकांसमोर मांडले व रसिकांना मंत्रमुग्ध केले.

बापट म्हणाले की, आत्महत्या करायला अक्कल लागत नाही. आत्महत्या करुन कोणतेही प्रश्न सुटत नाहीत तर आपल्या माघारी अनेक प्रश्न निर्माण करुन आपण कुटुंबाला निराधार करतो. आज अनेक ठिकाणी वेगळे राहण्यावरुन कुटुंबात वाद होतात, परंतु एकत्र कुटुंब पद्धतच सर्वात श्रेष्ठ आहे. यासाठी लहान पणापासूनच आपल्या मुलांवर चांगले संस्कार होणे गरजेचे आहे. १९४२ साली एका लहान मुलाने इंग्रजासमोर उभे राहून वंदे मातरम्चा नारा दिला व आज संसदेत वंदे मातरम् ऐच्छिक करा, असे म्हणणारे राज्यकर्ते कुठे, किती हा वेगळेपणा. लोकशाही म्हणजे कधी तरी लोकशाही नाही तर नेहमी शाही लोकांची ही अवस्था राज्यकर्त्यांची केली. आज देशाचा विचार करायला कोणालाही वेळ नाही. जो तो मी माझे कुटुंब, पैसा, बंगला, गाडी यातच गुरफटला आहे. लक्षात ठेवा देशाच्या सेवेसाठी कित्येक जवान सीमेवर आपले प्राण गमावून देश वाचवण्यासाठी शहीद होतात, पण त्याच देशात खुर्ची टिकविण्यासाठी राज्यकर्ते एकमेकांचे मुडदे पाडतात.

ज्या स्वातंत्र्य सैनिकांनी देशाला स्वातंत्र्य मिळावे यासाठी इंग्रजांच्या गोळ्या झेलल्या त्या स्वातंत्र्य सैनिकांना ताम्रपट देण्यात आली, पण काही स्वातंत्र्य सैनिकांची एवढी वाईट अवस्था राज्यकर्त्यांच्यामुळे झाली आहे की ते ताम्रपट भिक मागायच्या कटोरीसाठीही उपयोगात येईना, इतकी वाईट दशा झाली आहे.

या महाराष्ट्रात मराठी मायबोलीचा पुन्हा एकदा जागर करणे गरजेचे आहे. नव्या पिढीला पाश्चात्य संस्कृतीपासून बाजूला ठेवणे गरजेचे आहे. कारण आत्मा व ईश्वर या दोन शब्दाने आई हा शब्द तयार झाला आहे.

या भागाच्या विकासासाठी स्वर्गीय जी. डी. बापूंनी आपले आयुष्य वेचले. त्यांना मी विनम्र अभिवादन करतो व त्यांच्या पावलावर पाऊल ठेवत अरुण लाड, उदय लाड, प्रकाश लाड, किरण लाड व दिलीप लाड या भावंडांना मी त्यांच्या कार्यास शुभेच्छा देतो, असे ते शेवटी म्हणाले. बापट यांनी अतिशय मार्मिक, विनोदी कवितेतून लोकांच्या डोळ्यात समाजजागृतीचे अंजन घालून त्यांना विचार करण्यास भाग पाडले.

उपस्थित रसिकांनीही या कार्यक्रमास भरभरुन दाद दिली. विशेषतः महिला वर्गाने मोठी उपस्थिती दाखवत कार्यक्रमास चांगला प्रतिसाद दिला. काही वेळा हसवून, काही वेळा धीरगंभीर तर काही वेळा रसिकांच्या डोळ्यांच्या पापण्यांचा कडा ओला करायला भाग पाडले.

स्वागत, प्रास्ताविक सर्जेराव खरात यांनी, पाहुण्यांची ओळख नितीन जाधव यांनी करुन दिली तर आभार एम. एल. पुजारी यांनी मानले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन तृप्ती चिटणीस, पी. जे. आवटे व वैभव लाड यांनी केले.

या कार्यक्रमास क्रांती उद्योग समूहाचे संस्थापक अरुण लाड, क्रांती दूध संघाचे अध्यक्ष किरण लाड, उद्योगपती उदय लाड, दिलीप लाड, जिल्हा युवक राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद लाड, सरपंच मनिषाताई लाड, उपसरपंच हणमंत बंडगर उपस्थित होते.

दै- पुण्यनगरी, ता ०५/१२/२०१५

# मराठी माणूसच मायबोलीचे खच्चीकरण करतोय...

**विसुभाऊ बापट**
**कुंडल / वार्ताहर**

पाश्चात्य देशाच्या संस्कृतीच्या मागे लागून मराठी माणूस मराठी मायबोलीचे खच्चीकरण करत आहे. मायबोली विसरला आहे. यासाठी घरातील मातांनी आपल्या मुलांना मराठी मायबोली मातृभाषेचे धडे देणे गरजेचे आहे, असे मत ज्येष्ठ कवी विसुभाऊ बापट यांनी व्यक्त केले.

कुंडल येथे क्रांतिअग्रणी जी. डी. (बापू) लाड यांच्या ९३ व्या जयंतीनिमित्त समाज प्रबोधिनीच्या वतीने आयोजित व्याख्यानमालेत तिसरे पुष्प गुंफताना ते बोलत होते. कुटुंब रंगलंय काव्यात हा विषय होता. कवी बापट यांनी अनेक वेगवेगळ्या कवितांमधून समाजाच्या अनेक गोष्टी समोर आणल्या. शिक्षण व्यवस्था, भ्रष्टाचार, आराजकता, पाश्चात्य संस्कृती, शेतकरी आत्महत्या कुटुंब व्यवस्था या गोष्टींवर आधारीत अतिशय सुरेख विषय त्यांनी रसिकांसमोर मांडले व रसिकांना मंत्रमुग्ध केले.

बापट म्हणाले की, आत्महत्या करायला अक्कल लागत नाही. आत्महत्या करुन कोणतेही प्रश्न सुटत नाहीत तर आपल्या माघारी अनेक प्रश्न निर्माण करुन आपण कुटुंबाला निराधार करतो. आज अनेक ठिकाणी वेगळे राहण्यावरुन कुटुंबात वाद होतात, परंतु एकत्र कुटुंब पद्धतच सर्वात श्रेष्ठ आहे. यासाठी लहान पणापासूनच आपल्या मुलांवर चांगले संस्कार होणे गरजेचे आहे. १९४२ साली एका लहान मुलाने इंग्रजासमोर



कवी विसुभाऊ बापट

उभे राहून वंदे मातरम्‌चा नारा दिला व आज संसदेत वंदे मातरम् ऐच्छिक करा, असे म्हणणारे राज्यकर्ते कुठे, किती हा वेगळेपणा. लोकशाही म्हणजे कधी तरी लोकशाही नाही तर नेहमी शाही लोकांची ही अवस्था राज्यकर्त्यांची केली. आज देशाचा विचार करायला कोणालाही वेळ नाही. जो तो मी माझे कुटुंब, पैसा, बंगला, गाडी यातच गुरफटला आहे. लक्षात ठेवा देशाच्या सेवेसाठी कित्येक जवान सीमेवर आपले प्राण गमावून देश वाचवण्यासाठी शहीद होतात, पण त्याच देशात खुर्ची टिकविण्यासाठी राज्यकर्ते एकमेकांचे मुडदे पाडतात.

ज्या स्वातंत्र्य सैनिकांनी देशाला स्वातंत्र्य मिळावे यासाठी इंग्रजांच्या गोळ्या झेलल्या त्या स्वातंत्र्य सैनिकांना ताम्रपट देण्यात आली, पण काही स्वातंत्र्य सैनिकांची एवढी वाईट अवस्था राज्यकर्त्यांच्यामुळे झाली आहे की ते ताम्रपट भिक मागायच्या कटोरीसाठीही उपयोगात येईना, इतकी वाईट दशा झाली आहे.

या महाराष्ट्रात मराठी मायबोलीचा पुन्हा एकदा जागर करणे गरजेचे आहे. नव्या पिढीला पाश्चात्य संस्कृतीपासून बाजूला ठेवणे गरजेचे आहे. कारण आत्मा व ईश्वर या दोन शब्दाने आई हा शब्द तयार झाला आहे.

या भागाच्या विकासासाठी स्वर्गीय जी. डी. बापूंनी आपले आयुष्य वेचले. त्यांना मी विनम्र अभिवादन करतो व त्यांच्या पावलावर पाऊल ठेवत अरुण लाड, उदय लाड, प्रकाश लाड, किरण लाड व दिलीप लाड या भावंडांना मी त्यांच्या कार्यास शुभेच्छा देतो, असे ते शेवटी म्हणाले. बापट यांनी अतिशय मार्मिक, विनोदी कवितेतून लोकांच्या डोळ्यात समाजजागृतीचे अंजन घालून त्यांना विचार करण्यास भाग पाडले.

उपस्थित रसिकांनीही या कार्यक्रमास भरभरुन दाद दिली. विशेषतः महिला वर्गाने मोठी उपस्थिती दाखवत कार्यक्रमास चांगला प्रतिसाद दिला. काही वेळा हसवून, काही वेळा धीरगंभीर तर काही वेळा रसिकांच्या डोळ्यांच्या पापण्यांचा कडा ओला करायला भाग पाडले.

स्वागत, प्रास्ताविक सर्जेराव खरात यांनी, पाहुण्यांची ओळख नितीन जाधव यांनी करुन दिली तर आभार एम. एल. पुजारी यांनी मानले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन तृप्ती चिटणीस, पी. जे. आवटे व वैभव लाड यांनी केले.

या कार्यक्रमास क्रांती उद्योग समूहाचे संस्थापक अरुण लाड, क्रांती दूध संघाचे अध्यक्ष किरण लाड, उद्योगपती उदय लाड, दिलीप लाड, जिल्हा युवक राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद लाड, सरपंच मनिषाताई लाड, उपसरपंच हणमंत बंडगर उपस्थित होते.

दै. पुण्यनगरी - ०५/१२/२०१५

दै. पुण्यनगरी, ता- ०५/१२/२०१५

दै. पुण्यनगरी, ता- ०५/१२/२०१५

# 'क्रांतिअग्रणी लाड यांच्या विचारांची गरज'

कुंडल, ता. ५ : समाजातील वाढता स्वैराचार थोपविण्यासाठी क्रांतिअग्रणी जी. डी. लाड व संत तुकाराम यांच्या विचारांची पुन्हा क्रांती करावी लागेल, असे मत प्रा. शिवाजीराव भुंकेले यांनी केले.

क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. (बापू) लाड यांच्या जयंतीनिमित्त क्रांतिअग्रणी समाज प्रबोधन संस्थेतर्फे 'तुका म्हणे झालासे कळस' या विषयावर व्याख्यान झाले.

प्रा. भुकेले म्हणाले, ''समाजात जातीयता, द्वेष, मत्सर, गुन्हेगारी, वाढत आहे. समाजाने कोणत्याही बुवांकडे जाण्याची गरज नाही. मानसिक रोगांवर संत तुकारामांचे चरित्र सर्वोत्तम डॉक्टर आहे.'' या वेळी क्रांती उद्योगसमूहाचे अध्यक्ष अरुण लाड, किरण लाड, व्ही. वाय. पाटील, कुंडलिक एडके, उदय लाड, वसंतराव लाड, हणमंतदाजी लाड, अशोक पवार, युवक राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष शरद लाड, सरपंच मनीषा लाड, उपसरपंच हणमंत बंडगर, प्रा. डॉ. प्रताप लाड, जगन्नाथ आवटे, श्रीकांत माने, जयवंत आवटे, नथुराम पवार, सर्जेराव खरात, मुख्याध्यापक सी. वाय. जाधव, प्रा. धनंजय होनमाने, नवनाथ गुंड, व्ही. आर. माने, रमेश जंगम उपस्थित होते.

सकाळ
सांगली, शनिवार, ५ डिसेंबर २०१५
२

# महासत्तेपेक्षा देशवासीयांचे हास्य महत्त्वा

## डॉ. रघुनाथ माशेलकर : कुंडल येथे डॉ. माशेलकरांचा क्रांतिअग्रणी पुरस्काराने सन्मान

सकाळ वृत्तसेवा

कुंडल, ता. ४ : 'भारत देश महासत्ता होण्यापेक्षा भारतातील १२५ कोटी जनतेच्या चेहऱ्यावर हास्य फुलले पाहिजे,' असे प्रतिपादन ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी केले.

क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते डॉ. माशेलकर यांना क्रांतिअग्रणी पुरस्काराने येथे सन्मानित करण्यात आले. रोख ५१ हजार रुपये, मानचिन्ह व मानपत्र देऊन डॉ. माशेलकर यांना प्रतिष्ठेचा क्रांतिअग्रणी पुरस्कार प्रदान करण्यात आला. क्रांती उद्योग समूहाचे प्रमुख अरुण(अण्णा) लाड अध्यक्षस्थानी होते.

डॉ. माशेलकर म्हणाले, "भारत देशाकडून सर्वांना प्रचंड आशा आहे. १२५ कोटी चेहऱ्यांपेक्षा मेंदू कार्यरत आहेत. त्याचा वापर आपण केला पाहिजे. अनेक तंत्रज्ञान भारताकडून अमेरिका घेत आहे. ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञानात भारताची गतीने झेप सुरू आहे. मंगळापर्यंत पोचण्यास अमेरिकेला ७ हजार कोटी लागले. भारताने मंगळ मोहीम फक्त ४५० कोटी रुपयांमध्ये पहिल्याच प्रयत्नात यशस्वी करून जगाला आपली क्षमता दाखवली आहे. महासत्तेपेक्षा भारताची मूल्ये महत्त्वाची आहेत.''

डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, "क्रांतिअग्रणी जी. डी. बापू यांचा संपूर्ण जीवनपट विस्मयकारी व आदर्शवत ठरला आहे. जी. डी. बापू, डॉ. माशेलकर व माझ्या कर्तृत्वाला आम्हा तिघांच्या माउलींचे संस्कार व कष्ट महत्त्वपूर्ण ठरले." अरुणअण्णा लाड म्हणाले, "स्वातंत्र्यानंतरही जी. डी. बापू समाजातल्या श्रमिक, गरीब लोकांच्या सुखासाठी लढत राहिले. शेतीधंद्यावर सर्वांकडून हल्ले होत आहेत. आपल्या हक्काच्या शेतीवर होणाऱ्या अन्यायाबाबत आपण लढाऊवृत्ती का दाखवित नाही ?"

समारंभास वसंतदादा साखर कारखान्याचे अध्यक्ष विशाल पाटील, निवृत्त नोंदणी महानिरीक्षक दिलीपराव देशमुख, श्रीसत्यविजय बँकेचे बाळासाहेब पवार, क्रांती दूध संघाचे अध्यक्ष किरण तात्या लाड, प्रकाश लाड, उदय लाड, सरपंच मनीषा लाड, क्रांतीचे माजी उपाध्यक्ष पोपटराव संकपाळ, कृष्णा कारखान्याचे जगदीश हरळीकर, प्राचार्य डॉ. पी. आर. पवार, डॉ. प्रताप लाड, व्ही. वाय. पाटील, शिवाजी विद्यापीठाचे विजय काकडे, कुंडलिक एडके, वसंतराव लाड, प्रा. डॉ. प्रकाश कुंभार, शरद लाड आदी उपस्थित होते. मानपत्र वाचन व्ही. डी. लाड यांनी केले. प्राचार्य नलवडे यांनी आभार तर श्रीकांत माने यांनी सूत्रसंचालन केले.




कुंडल : शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशे
शुक्रवारी क्रांतिअग्रणी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सोबत क्रांती उद्योग समूहाचे प्रमुख अ
लाड व मान्यवर.

दै सकाळ 05/12/2015


# उच्च तंत्रज्ञानाचा लाभ गरिबांपर्यंत पोहोचवा : डॉ. माशेलकर

## * क्रांतिअग्रणी पुरस्काराचे कुंडलमध्ये वितरण

कुंडल : वार्ताहर

भारताने ज्ञान, विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रात मोठी प्रगती केली आहे. उच्च तंत्रज्ञान श्रीमंतासाठी कोणीही तयार करेल; परंतु तयार केलेले उच्च तंत्रज्ञान गरिबापर्यंत पोहोचवून त्याचा लाभ घेता आला पाहिजे, असे प्रतिपादन ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी शुक्रवारी कुंडल येथे व्यक्त केले.

क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड यांच्या ९३ व्या जयंतीनिमित्त 'क्रांतिअग्रणी पुरसकार' डॉ. रघुनाथ माशेलकर यांना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते देण्यात आला यावेळी ते बोलत होते. यावेळी रोख ५१ हजार, मानपत्र, मानचिन्ह, शाल, श्रीफळ देऊन डॉ. माशेलकर यांचा सन्मान करण्यात आला.



कुंडल येथे डॉ. रघुनाथ माशेलकर यांना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्याहस्ते क्रांतिअग्रणी पुरस्कार देण्यात आला. यावेळी अरुण लाड उपस्थित होते.

डॉ. माशेलकर म्हणाले, क्रांतिअग्रणी बापूंच्या कार्याशी सुसंगत माझे नाव जोडले गेले हा माझ्या आयुष्यातील अविस्मरणीय प्रसंग आहे. सर्वसामान्य लोकांच्या विकासासाठी योगदान दिले आहे. मला माझ्या आईने घडविले आहे. माझ्या आईमुळेच मला ३५ विद्यापीठांची डी. लीट. पदवी मिळाली आहे. प्रत्येकाने जबाबदारी घेतली तर पर्यावरणाची काळजी करण्याची गरज नाही. मी पैसे घेणार नाही अशी वैयक्तिक प्रत्येकाने जबाबदारी घेतली तर भ्रष्टाचाराला आळा बसेल. वर्तमानपत्रात पहिल्या पानावर चांगल्या बातम्या हव्यात, तर ते वर्तमान पत्र समाजाला दिशा देऊ शकेल. देशातील १२५ कोटी जनतेच्या मुखावर हास्य असेल, असा भारत देश घडविण्याची गरज आहे. भारत देशात यापूर्वी तंत्रज्ञानाची भीक इतर देशाकडे मागत होता. परंतु आज परिस्थिती बदलली असून इतर देश भारताकडे तंत्रज्ञानाची भीक मागू लागली आहेत. देशात १२५ कोटी तोंडे नाहीत तर १२५ कोटी मेंदू आहेत. मंगळापर्यंत जाण्यास (पुढील मजकूर पान ८ वर)

दै. केसरी - ०५/१२/२०१५

दै. केसरी - ०५/१२/२०१५

# उच्च तंत्रज्ञानाचा लाभ गरिबांपर्यंत पोहोचवा : डॉ. माशेलकर

(पान १ वरून)
अमेरिकेला ७ हजार कोटी लागले.पण भारताने मंगळ मोहिमेसाठी ४५० कोटी रुपये पहिल्याच प्रयत्नात मोहिम यशस्वी करून जगाला आपली क्षमता दाखविली. महासत्तेपेक्षा भारताची मूल्ये महत्वाची आहेत. डॉ. अब्दुल कलाम हे त्यांच्या निगर्वी व अनुकंपा स्वभावामुळे

क्रांती उद्योग व शिक्षण समुहाचे प्रमुख अरूण लाड प्रास्ताविकपर भाषणात म्हणाले, बापूंनी स्वातंत्र्य लढा उारला त्यांच्या नावाने पुरस्कार देऊन त्यांचे विचार समाजापुढे नेण्याचा प्रयत्न आहे. बापूंनी कधीही सन्मान, पुरस्काराची अपेक्षा केली नाही. सर्वसामान्यातून पुढे आलेला व्यक्तींना पुरस्कार

लाड, माजी नोंदणी महानिरीक्षक दिलीपराव देशमुख, सरपंच मनिषा लाड, उपसरपंच हणमंत बंडगर, कुंडलिक एडके, माजी सरपंच वसंतराव लाड, लालासो यादव, क्रांतीचे कार्यकारी संचालक चंद्रकांत मव्हाणे, कृष्णा कारखान्याचे कार्यकारी संचालक जगदीश हरळीकर, व्ही. वाय. पाटील, डॉ. प्रकाश कुंभार

दै. जनप्रवास ०५/१२/२०२५

# महासत्तेपेक्षा हास्य महत्वाचे : माशेलकर

## कुंडलमध्ये डॉ.माशेलकरांना क्रांतीअग्रणी पुरस्कार प्रदान



शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.देवानंद शिंदे यांच्या हस्ते ज्येष्ठ शास्त्रज्ञ रघुनाथ माशेलकर यांना क्रांतीअग्रणी पुरस्कार प्रदान करण्यात आला यावेळी अरुणअण्णा लाड, दिलीपराव देशमुख, विशाल पाटील

**कुंडल । प्रतिनिधी**

सर्वसामान्यांसाठी उच्च तंत्रज्ञान विकसित झाले पाहिजे, भारत महासत्ता होणे अभिमानास्पद आहे पण त्याहीपेक्षा प्रत्येकाच्या मुखात अन्नाचा घास जावा व त्याच्या चेहऱ्यावर हास्य फुलावे हे महत्वाचे आहे, असे तिखट प्रतिपादन ज्येष्ठ शास्त्रज्ञ

(पान ५ वर..)

पान १ वरुन..

## महासत्तेपेक्षा हास्य महत्वाचे..

डॉ.रघुनाथ माशेलकर यांनी शुक्रवारी कुंडल येथे केले. क्रांतीअग्रणी जी.डी.बापू लाड फौंडेशनच्यावतीने 'क्रांतीअग्रणी पुरस्कार' डॉ.रघुनाथ माशेलकर यांना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु देवानंद शिंदे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या सोहळ्यात डॉ.माशेलकर बोलत होते.

ते पुढे म्हणाले, सर्वसामान्यांच्या विकासासाठी ज्यांनी अहोरात्र कष्ट घेतले त्यांच्या नावाने दिला जाणारा पुरस्कार मला मिळाला, हे मी माझे भाग्य मानतो. आपण आता ज्ञान विज्ञानात मोठी प्रगती करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर शेतकरी डाळींब उत्पादकासाठी डाळिंबावरील रोगासाठी संशोधन होणे गरजेचे आहे. माझी आई मला नेहमी म्हणे, गोरगरीब जनतेसाठी काही तरी गेले पाहिजे. सर्वसामान्यांसाठी उच्च तंत्रज्ञान विकसित केले पाहिजे. मी असे म्हणेन, बाल संशोधक हे खेड्यापाड्यामध्ये ग्रामीण भागामध्ये आहेत, त्याकडे लक्ष दिले पाहिजे. भारत महासत्ता होण्यापेक्षा येथे प्रत्येकाच्या मुखामध्ये घास गेला पाहिजे व चेहऱ्यावर हास्य उमलले पाहिजे. हे महासत्तेपेक्षा महत्वाचे.

कुलगुरु देवानंद शिंदे म्हणाले, क्रांतीकारकाच्या जन्मगावी येणे हे माझे भाग्य समजतो. बापूंनी आपल्या जीवनामध्ये जे जे सर्वसामान्य जनतेसाठी प्रयत्न केले त्यांची व्याप्ती मोठ्या प्रमाणात आहे. प्रत्येकाने शिक्षण हे घेतले पाहिजे, शिक्षणाने ज्ञान मिळते. मुलाच्या शिक्षणामध्ये आईचे योगदान महत्वाचे आहे. प्रत्येकाने आपले काम आपल्या ठरलेल्या वेळेत आपल्याला पूर्ण केले पाहिजे. विद्यार्थ्यांना स्वावलंबी बनविणे आता काळाची गरज आहे. सर्व समावेशक धोरण राबविले पाहिजे. त्याचबरोबर शेती म्हणजे नवनवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करुन शेती उत्पन्न कसे वाढवता येईल हे बघितले पाहिजे तरच भविष्यात शेती उद्योग टिकेल.

कार्यक्रमाच्या सुरवातीला मान्यवरांच्या हस्ते बापूच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले, तर स्वागत व प्रास्ताविक क्रांती उद्योग समुहाचे प्रमुख अरुण लाड यांनी केले. यावेळी ते म्हणाले, अन्न, वस्त्र, निवारासाठी बापू आयुष्यभर लढत राहिले. यासाठी आम्ही आजपर्यंत कोणत्याही राजकीय लोकांना पुरस्कार न देता जे गोरगरीब जनतेसाठी कार्य करत आहेत त्यांना देत आलो आहे आहोत. आताच्या काळामध्ये शेती टिकवण्यासाठी कोणीही प्रयत्न करताना दिसत नाही. युवक वर्गासाठी योग्य ते प्रयत्न करणे आवश्यक आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीकांत माने यांनी तर मानपत्राचे वाचन व्ही.डी.लाड यांनी केले. आभार प्रा.के.एम.नलवडे यांनी मानले.

यावेळी वैभव नायकवडी, विशाल पाटील, जगदीश हरळीकर, शरद लाड, अरुण लाड, किरण लाड, उदय लाड, दिलीप लाड

# महासत्ता भारतात जनतेचे समाधान महत्त्वाचे

## डॉ. रघुनाथ माशेलकर यांचे प्रतिपादन; कुंडलमध्ये क्रांतिअग्रणी पुरस्कार प्रदान

कुंडल : वार्ताहर

भारत महासत्ता होण्याबरोबरच १२५ कोटी जनतेच्या चेहऱ्यावर सुहास्य असणे आवश्यक असल्याचे मत प्रसिध्द शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी शुक्रवारी येथे व्यक्त केले. क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड यांच्या जयंतीदिनी क्रांतिअग्रणी पुरस्कार शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्याहस्ते डॉ. माशेलकर यांना देण्यात आला. त्याप्रसंगी ते बोलत होते.

डॉ. माशेलकर पुढे म्हणाले, देशातील मूल्ये फार महत्वाची असून त्यांचे जतन करण्यासाठी आपण काय केले पाहिजे हे महत्वाचे आहे. क्रांतिअग्रणी पुरस्कार देऊन स्वर्गीय जी.डी. बापूंच्याबरोबरीने माझे नाव जोडले गेले याचा मला सार्थ अभिमान आहे. देशातील १२५ कोटी मेंदूचा वापर देशाच्या विकासासाठी झाला पाहिजे. बालसंशोधक खेड्यापाड्यात असून त्यांचा शोध घेणे आवश्यक आहे.



कुंडल (ता. पलूस) येथे क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड यांच्या जयंतीदिनी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्याहस्ते क्रांतिअग्रणी पुरस्कार स्वीकारताना ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर. सोबत अरूणअण्णा लाड, विशाल पाटील, दिलीपराव देशमुख आदी.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, ज्ञानाला वंदन करण्याची गरज आहे. मातृत्वाचा स्पर्श झाला नसता तर आम्ही शिक्षणापासून दुरावलो असतो. दीडशे वर्षाच्या शिक्षणव्यवस्थेने आपल्याला स्वावलंबी व सुसंस्कारीत बनविले का हे पाहण्याची वेळ आली आहे. क्रांती उद्योग व शिक्षण समुहाचे प्रमुख अरूणअण्णा लाड म्हणाले, अन्न, वस्त्र, निवारा, योग्य शिक्षण सर्वसामान्यांना मिळाले पाहिजे यासाठी बापू सतत संघर्ष करीत राहिले.

डॉ. माशेलकर यांना क्रांतिअग्रणी पुरस्कार, ५१ हजार रुपये, स्मृतीचिन्ह, मानपत्र देऊन गौरविण्यात आले. जी. डी. बापू लाड व क्रांतिविरांगना विजयाताई लाड यांच्या प्रतिमांचे पूजन झाले.

माजी जिल्हाधिकारी प्रकाश पाटील, सांगली कारखान्याचे अध्यक्ष विशाल पाटील, युवा नेते शरद ॲड. प्रकाश कुंभार, क्रांती दूध स अध्यक्ष किरण लाड, ॲड. प्र लाड, उद्योजक उदय लाड, लाड, सत्यविजय बँकेचे अ बाळासाहेब पवार, दिलीप देश सचिव वसंतराव लाड, व्ही. पाटील, हणमंतदाजी लाड, प्र डॉ. पी. आर. पवार, कुंडलिक सरपंच सौ. मनीषा लाड, कारखान्याचे कार्यकारी संच जगदीश हरळीकर, माजी वसंतराव लाड, प्रा. डॉ. प्रताप उपस्थित होते. सूत्रसंचलन श्री माने यांनी केले. मानपत्र वाचन व्ही. डी. लाड यांनी केले. अ प्राचार्य डॉ. के. एन. नलावडे मानले.

दै पुढारी ०५/१२/२०१५

दै. पुढारी ०५/१२/२०१५

दै. लोकमत, ०५/१२/२०१५



नाथ माशेलकर : कुंडलला जी. डी. बापूंच्या जयंतीदिनी 'क्रांतिअग्रणी' पुरस्काराने गौरव

# ंशोधनाचा लाभ सर्वसामान्यांना व्हावा

आज तंत्रज्ञान, संशोधन
ती घडत आहे. भारत देश
होण्याबाबत बोलले जाते.
देश महासत्ता होण्यापेक्षा
सव्वाशे कोटी जनतेच्या
स्य फुलेल, असे वातावरण
गरज आहे. नवनवीन
संशोधन सर्वसामान्यांना
उपलब्ध होणे आवश्यक
से प्रतिपादन जागतिक
ष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ
यांनी केले.
(ता. पलूस) येथे ज्येष्ठ
ानी क्रांतिअग्रणी डॉ. जी.
लाड यांच्या जयंतीदिनी
विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.
शिंदे यांच्याहस्ते त्यांना
गी' पुरस्काराने गौरवण्यात
प्रसंगी ते बोलत होते.
द्योग समूहाचे प्रमुख अरुण
लाड, विशाल पाटील व
मुख उपस्थित होते.
ाशेलकर म्हणाले, भारताने
न व तंत्रज्ञान क्षेत्रात मोठी

प्रगती केली आहे. देशातील उच्च तंत्रज्ञान श्रीमंतांसाठी कोणीही उपलब्ध करुन देऊ शकेल, परंतु ते सर्वसामान्यांनाही सहजपणे उपलब्ध होण्याची गरज आहे.

कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, पारंपरिक शिक्षण व उच्च तंत्रज्ञान शिक्षण एकत्र आल्यास भारत शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर ठरेल. विविध क्षेत्रात संशोधन कौशल्ये व तंत्रज्ञानाच्या वापराची गरज आहे.

अरुण (अण्णा) लाड म्हणाले, सर्वसामान्यांतून येऊन विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या व्यक्तीस 'क्रांतिअग्रणी' पुरस्काराने गौरवण्यात येते. जी. डी. बापू देशाच्या स्वातंत्र्यासाठी लढले. स्वातंत्र्यानंतरही त्यांनी अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण व प्रत्येकाच्या हाताला काम मिळाले पाहिजे, यासाठी लढा दिला. जनतेच्या समस्या कोणालाही कळत नाहीत. शेतीमालाला योग्य दर मिळत नाही. योग्यवेळी आयात-निर्यात धोरणे राबवली पाहिजेत. तांत्रिक शिक्षण प्रत्येकाला मिळाले पाहिजे. शेतीतील समस्या सोडविण्यासाठी सर्वांनी एकत्र आले पाहिजे.

यावेळी क्रांती दूध संघाचे अध्यक्ष किरण लाड, शरद लाड, सत्यविजय बँकेचे अध्यक्ष बाळासाहेब पवार, ॲड. प्रकाश लाड, उद्योगपती उदय लाड, दिलीप भाऊ लाड, व्ही. वाय. पाटील, कुंडलिक एडके, लालासाहेब यादव, निवृत्त जिल्हाधिकारी प्रकाश पाटील, लीलाताई जाधव, माजी सरपंच वसंतराव लाड, अशोक पवार, जगन्नाथ आवटे, सुमनताई गायकवाड, कृष्णा कारखान्याचे कार्यकारी संचालक जगदीश हरलीकर, 'क्रांती'चे कार्यकारी संचालक चंद्रकांत गव्हाणे, प्राचार्य सुनील कांबळे, प्राचार्य पी. आर. पवार, डॉ. प्रकाश कुंभार, उपसरपंच विठ्ठल बंडगर, शहाजी लाड, चंद्रकांत रोकडे, विजय काकडे उपस्थित होते. प्रा. व्ही. डी. लाड यांनी मानपत्र वाचन केले. श्रीकांत माने यांनी सूत्रसंचालन केले. प्राचार्य के. एम. नलावडे यांनी आभार मानले. (वार्ताहर)

## मूल्ये महत्त्वाची : मुलांना चांगली प्रेरणा द्या

देशातील जनतेच्या बुध्दीत ज्ञान आहे. देशासाठी प्रत्येकाच्या ज्ञानाचा वापर झाला पाहिजे. देशातील विविध क्षेत्रातील संशोधन सर्वसामान्यांसाठी महत्त्वाचे आहे. विविध क्षेत्रात संशोधन करणारी नवी पिढी पुढे येत आहे. देश महासत्ता होण्यापेक्षा देशातील मूल्ये, त्यांचे जतन करणे महत्त्वाचे आहे. आज देशात कार्याशी सुसंगत माणसांच्या विकासासाठी कार्य होण्याची गरज आहे. अनेक युवक समाजासाठी कार्य करीत आहेत. भारताचे भवितव्य मुलांमध्ये आहे. त्यामुळे मुलांना चांगली प्रेरणा देण्याची गरज आहे.


## विद्यार्थ्यांना स्वावलंबी शिक्षणाची गरज : डॉ. शिंदे

डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, विद्यार्थ्यांना स्वावलंबी बनवून संस्कृती शिकविणाऱ्या शिक्षणाची गरज आहे. जी. डी. बापूंच्या प्रयत्नांनी कुंडल परिसरात विकास घडला. बापूंच्या कार्याची प्रेरणा युवकांनी घेतली पाहिजे. एकवीसाव्या शतकात शिक्षण क्षेत्रात अनेक आव्हाने आहेत.




कुंडल (ता. पलूस) येथे शुक्रवारी जी. डी. (बापू) लाड यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्याहस्ते आंतरराष्ट्रीय कीर्तीचे शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांना 'क्रांतिअग्रणी' पुरस्काराने गौरविण्यात आले. यावेळी क्रांती कारखान्याचे अध्यक्ष अरुण लाड, निवृत्त नोंदणी महानिरीक्षक दिलीप देशमुख, वसंतदादा कारखान्याचे अध्यक्ष विशाल पाटील उपस्थित होते.

दैनिक ललकार



पान नं ३
५/१२/२०१५

# क्रांतीअग्रणी जी.डी. (बापू) यांची ९३ वी जयंती साज



कुंडल दि. ४ (वार्ताहर) - क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड यांच्या ९३ व्या जयंती निमित्त आयोजीत करण्यात आलेचे दुसऱ्या दिवशी साधना मासिकाचे संपादक विनोद शिरसाट यांनी युवकहो तुमच्यासाठी या विषयावर मार्गदर्शन केले यावेळी क्रांती उद्योग समूहाचे अध्यक्ष अरुण (आण्णा) लाड, क्रांती दुध संघाचे अध्यक्ष किरण (तात्या) लाड, उद्योजक उदय (आप्पा) लाड, सांग्ली जिल्हा युवक राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद लाड आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीअग्रणीच्या प्रतिमेचे पूजन करुन करण्यात आले. यावेळी शिरसाट म्हणाले, मला कुंडलला आमचे भाग्य बापू असताना झाले असले तर ते सार्थक झाले असते ही खंत माझी आयुष्यभर राहील. जी.डी. बापूंनी समाज परिवर्तनासाठी केलेले कार्य हे उल्लेखनीय आहे आणि अशी माणसे भविष्यात होणे नाही. तरुण कोणाला म्हणावे हे सांगताना ते म्हणाले १६ ते ५९ वयोगटातील लोकांना तरुण म्हणावे आणि या गटातील आपल्या भारतात सर्वात जास्त संख्या आहे. त्यामुळे असे म्हटले जाते की, एकदिवस भारत महासत्ता बनेल. १९९१ मध्ये उदारीकरण आरक्षण हे धोरण अवलंबिले ही दोन्ही धोरणे एकमेकांना पूरक आहेत म्हणजेच देशात आरक्षण यशस्वी होणेस उदारीकरण आवश्यक आहे उदारीकरणास आरक्षण आवश्यक आहे. सर्वच क्षेत्रामध्ये कुशल मनुष्यबळाचा अभाव हे देशासमोरचे मोठे आवाहन आहे तसेच मुलभूत संशोधनाचा अभाव व सामाजिक तळमळतेचा अभावही दिसतो त्यामुळे तरुणाईचा विकास करण्यासाठी सामाजिक नेतृत्वाने पुढाकार घ्यावा कारण तरुणाईला बाहेरच्या प्रभावातून वाचवणेसाठी व चुकीच्या मार्गाने न जाऊ देणे या जबाबदाऱ्या सामाजिक नेतृत्व करणाऱ्यांनी पार पाडाव्यात.


विकासाची व्याख्या सांगताना ते म्हणाले, गुणात्मक आणि संख्यात्मक वाढ म्हणजे विकास होय. आज शासनाने शालेय शिक्षणाचे जे धोरण अवलंबिले आहे ते फक्त विद्यार्थ्यांची संख्यात्मक वाढ करु शकते त्यामुळे देशास येत्या काही वर्षात शिक्षण संस्थाना जो निधी दिला जातो तो वाढवावा असे म्हटले जाते परंतू तो वाढविणेसाठी शासनाला इतर खात्यातून निधी काढावा लागतो अशा पेचप्रसंगामुळे शिक्षणाचे खाजगीकरण होत आहे.

ते पुढे म्हणाले, जगभरातून जेवढे इंजिनिअर तयार होतात त्यातील ५० टक्के इंजिनिअर एकट्या इन्फोसीस या कंपनीला लागतात त्याच्या सर्वेक्षणावरुन असे दिसून आले की, या सर्व इंजिनिअरामध्ये मुलींचे प्रमाण जास्त आहे आणि हे सर्व सर्वसामान्य कुटुंबातूनच आलेले आहेत. सध्या युपीएससी अभ्यासक्रमात नीतीशास्त्र हा समाविष्ट केला आहे पर अभ्यासक्रमाबाबत को मार्गदर्शक पुस्तके नाहीत य विद्यार्थ्यांनी विचारणा केली संयोजकांनी असे सांगणेत की नितीशास्त्राबाबतची हवी असलेस साधना सा वाच असे त्यांनी सांगित

शेवटी ते म्हणाले, काम करणे हे तितके नाही जितके देशांतर्गत मिटविणे, सामाजिक व्यवस्था सुधारणे. शिक्षण सुधारणे, अन्याय, अत्याच वाचा फोडणे, अंधश्रद्धा करणे.

कार्यक्रमाचे प्रास्त माणिक गोतपागर यांनी पाहुण्यांची ओळख कथाक जयवंत आपटे यांनी सूत्रसंचालन आर. वाय. मॅडम यांनी केले तर आभा डुबल यांनी केले.

# "क्रांतिअग्रणी पुरस्कार प्रदान सोहळा"



क्रांतिअग्रणी
स्व. डॉ. जी. डी. (बापूसो) लाड
संस्थापक - क्रांती उद्योग व शिक्षण समूह

क्रांतिअग्रणी स्व. डॉ. जी.डी. (बापूसो) लाड यांच्या १३ व्या जयंतीदिनी दिला जाणारा सन २०१५ चा क्रांतिअग्रणी पुरस्कार यावर्षी....



सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ
मा. डॉ. रघुनाथ माशेलकर यांना



शिवाजी विद्यापीठ कुलगुरू
डॉ. देवानंद शिंदे
यांच्या शुभहस्ते

प्रदान करण्यात येणार आहे. तरी आपण या कार्यक्रमास उपस्थित राहावे, ही विनंती.

क्रांतिअग्रणी स्वर्गीय डॉ.जी.डी.बापू लाड यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन !

वेळ : शुक्रवार, दि. ४ डिसेंबर २०१५ रोजी सायंकाळी ५.३० वाजता
स्थळ : कुंडल ग्रामपंचायत कार्यालय पटांगण, कुंडल

| वसंतराव लाड | चंद्रकांत गव्हाणे | भीमराव महिंद | अरुण (आण्णा) लाड |
|---|---|---|---|
| सेक्रेटरी | कार्यकारी संचालक | व्हाईस चेअरमन | चेअरमन |

विनित

सर्व संचालक, अधिकारी, कामगार व कर्मचारी....

## क्रांतिअग्रणी डॉ. जी.डी. बापू लाड सहकारी

# क्रांतिअग्रणी पुरस्कार



कुंडल : क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड पुरस्कार ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांना शुक्रवारी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी क्रांती कारखान्याचे चेअरमन अरुण (अण्णा) लाड, निवृत्त नोंदणी महानिरीक्षक दिलीपराव देशमुख, वसंतदादा कारखान्याचे चेअरमन विशाल पाटील उपस्थित होते. ...वृत्त पान २ वर (छाया : सचिन लडगे, कुंडल)

# डॉ. जी. डी. बापू लाड यांच्या तैलचित्राचे अनावरण

केसरी

15/12/15

कुंडल : वार्ताहर

येथील गांधी एज्युकेशन सोसायटीच्या क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालयामध्ये स्वर्गीय क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड यांच्या तैलचित्राचे अनावरण ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या हस्ते करण्यात आले.



कुंडलमध्ये क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालयामध्ये क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड यांच्या तैलचित्राचे अनावरण ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, डॉ. विजय ककडे, क्रांती उद्योग समूहाचे प्रमुख अरुण लाड, किरण लाड, शहाजी लाड, चंद्रकांत लाड, शहाजी लाड, चंद्रकांत रोकडे, ज्येष्ठ विचारवंत व्ही. वाय. पाटील, प्राचार्य डॉ. पी. पी. कुंभार, प्राचार्य डॉ. बी. एन. पवार, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. एम. नलावडे, डॉ. प्रताप लाड, उद्योजक उदय लाड, सी. वाय. जाधव, प्रकाश कणसे, विद्यार्थी, विद्यार्थी उपस्थित होते.

दै. केसरी, ता- १५/१२/२०१५

तरुण भारत 15/02/15

# डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्याहस्ते तैलचित्राचे अनावरण

कुंडल : येथील गांधी एज्युकेशन सोसायटीच्या क्रांतीअग्रणी जी.डी.बापू लाड महाविद्यालयामध्ये स्व. क्रांतीअग्रणी डॉ. जी.डी.बापू लाड यांच्या तैलचित्राचे अनावरण जेष्ठ शास्त्रज्ञ डॉ.रघुनाथ माशेलकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, शिवाजी विद्यापीठाचे परीक्षा नियंत्रक डॉ. विजय काकडे, क्रांती उद्योग समुहाचे प्रमुख अरूण लाड, गांधी एज्युकेशन सोसायटीचे सचिव शहाजी लाड, चंद्रकांत रोकडे, विचारवंत व्ही.वाय.पाटील, प्राचार्य डॉ.पी.पी.कुंभार, डॉ.प्रताप लाड, उद्योजक उदय लाड, प्रतिनिधी हायस्कूलचे मुख्याध्यापक सी.वाय.जाधव, उपमुख्याध्यापक प्रकाश कणसे, महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक, कार्यालय प्रमुख रमेश जंगम, सर्व कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दै. तरुण भारत ता-15/02/2015

# क्रांतिअग्रणी महाविद्यालयात जी. डी. बापू लाड यांचे तैलचित्र

कुंडल : वार्ताहर

कुंडल (ता. पलूस) येथील गांधी एज्युकेशन सोसायटीच्या क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालयात , क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड यांच्या तैलचित्राचे अनावरण थोर शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्याहस्ते झाले.

या प्रसंगी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, परीक्षा नियंत्रक डॉ. विजय काकडे, क्रांती उद्योग व शिक्षण समूहाचे प्रमुख अरूण लाड, क्रांती दूध संघाचे अध्यक्ष किरण लाड, संस्थेचे सचिव शहाजी लाड, सहसचिव चंद्रकांत रोकडे, व्ही. वाय. पाटील, प्रा. डॉ. प्रकाश कुंभार, प्रा. डॉ. बी. एन. पवार, प्राचार्य डॉ. के. एम. नलावडे, प्रा. डॉ. प्रताप लाड, उद्योजक उदय लाड, चंद्रकांत जाधव, प्रकाश कणसे, सर्व प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.

दै. पुढारी , ता. १५/१२/२०१५